पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १६९**

(सभावृत्तांत)

**दिनांक – ०४/०५/२०२०** **वेळ – दु.०२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **विशेष** सभा **सोमवार दि.०४/०५/२०२०** रोजी दु.०२.३० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. **मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे – सभापती**
२. मा.चोंधे आरती सुरेश
३. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
४. मा.लांडगे राजेंद्र किसनराव
५. मा.पंकज दत्तात्रय भालेकर
६. मा.कलाटे मयुर पांडुरंग
७. मा.कलाटे राहुल तानाजी
८. मा.कदम शशिकांत गणपत
९. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
१०. मा.संतोष बबन कांबळे
११. मा.अभिषेक गोविंद बारणे
१२. मा.बुर्डे सुवर्णा विकास
१३. मा.फुगे भिमाबाई पोपट
१४. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
१५. मा.सुलक्षणा राजू धर

या शिवाय मा.श्रावण हर्डिकर – आयुक्त, मा.पाटील – अति.आयुक्त(१), मा.पवार – अति.आयुक्त(२), मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.डॉ.रॉय – आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.निकम – सह शहर अभियंता, मा.चितळे, मा.झगडे, मा.लोणकर, मा.खोत - सहाय्यक आयुक्त, मा.पोमण – मुख्य माहिती तंत्रज्ञान अधिकारी, मा.डॉ.वाबळे – अधिष्ठाता YCMH, मा.चव्हाण-कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.**

सुचक – मा.शितल शिंदे                                        अनुमोदक – मा.राहुल कलाटे

छत्तीगढ मधील सुकमा जिल्ह्यामध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यामध्ये १७ पोलीस शहिद्र, जम्मू काश्मीर मधील कुपवाडा जिल्ह्यातील खेडवाडा येथे दहशतवादी हल्लयात ५ जवान शहीद, कोरोनामुळे भारतामधील व इतर देशातील मृत्यु पावलेल्या सर्व नागरिकतसेच खालील मान्यवरांचे नुकतेच दु:खद निधन झाले आहे. त्यांना आजच्या मा.स्थायी समिती सभेत श्रध्दांजली वाहण्यात यावी.

१) मांगेराम गुप्ता- हरियाणा राज्याचे माजी अर्थमंत्री व अगरवाल समाजाचे नेते यांचे निधन.
२) भाईजान काझी -पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाचे माजी सभापती यांचे निधन.
३) अनंत भगवान दीक्षित - ज्येष्ठ पत्रकार आणि सकाळचे माजी संपादक यांचे निधन.
४) हिंदुराव नाईक निंबाळकर-शिवसेनेचे माजी खासदार यांचे निधन
५) दत्तात्रय अंत्रे- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे मुख्य लिपिक यांचे निधन.
६) जयराम कुलकर्णी व रविराज- जेष्ठ अभिनेते यांचे निधन.
७) किशोर पाठक - जेष्ठ कवी यांचे निधन.
८) सावित्रीआक्का पाटील- ना.राजेंद्र पाटील यड्रावकर यांचे मातोश्री यांचे निधन.
९) विष्णू कांबळे- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे माजी उपमहापौर यांचे निधन.
१०) ऋषी कपूर व इरफान खान- हिंदी चित्रपट सृष्टीतील प्रसिध्द अभिनेते यांचे निधन.
११) किसनमहाराज कलाटे- ह.भ.प. यांचे निधन.
१२) ज्ञानोबा गेणबा कदम यांचे निधन.

वरील मान्यवर व शहरातील ज्ञात अज्ञात दिवंगत व्यक्तींना आजच्या सभेत श्रध्दांजली वाहणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**(**सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली**)**

**----------**

( पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्याकरिता उत्तमरित्या उपाययोजनां बाबतचे नियोजन केल्यामुळे मा.श्रावण हर्डिकर,आयुक्त् , मा.अति.आयुक्त् (१) व (२), वैद्यकिय विभागाकडील अधिकारी, डॉक्टर्स् व त्यांचा संपूर्ण स्टाफ् आरोग्य विभागाकडील अधिकारी, कर्मचारी, तसेच या कामकाजाकरिता नियुक्त केलेल्या सर्व अधिकारी, कर्मचारी यांचे मा.सभापती यांनी सभागृहाच्या वतीने अभिनंदन केले.)

--------

ठराव क्रमांक – ६९८४ विषय क्रमांक – १
दिनांक – ०४/०५/२०२० विभाग–जलनि:सारण मुख्यालय
सुचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.चौंधे आरती
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.जनि/२/कावि/५८९/२०२०, दि.१६/०३/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या जलनि:सारण विभागाकडील नि.नो.क्र.3/114/2019-20 अन्वये प्रभाग क्र.१ चिखली येथिल नेवाळेवस्ती पंप हाऊस परिसरात जलनिःसारण व्यवस्थेमध्ये सुधारणा करणेकामी मे.श्री.सदगुरुकृपा कन्स्ट्रक्शन नि.र.रू.83,78,091/- (अक्षरी र.रु.ञ्याऐंशी लाख अठ्याहत्तर हजार एक्यान्नव फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.83,78,049/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदरकाम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.83,78,049/-पेक्षा 25.6% कमी म्हणजेच र.रु.62,33,268/- + रॉयल्टी चार्जेसर.रु.42/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.0/- = एकुण र.रु.62,33,310/-पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचे बरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – ६९८५ विषय क्रमांक –२
दिनांक – ०४/०५/२०२० विभाग–जलनि:सारण मुख्यालय
सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.जनि/२/कावि/५९०/२०२०, दि.१६/०३/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या जलनि:सारण विभागाकडील नि.नो.क्र.7/8/2019-20 अन्वये प्रभाग क्र.२८ मधील विश्वशांती कॉलनी,गावठाण परिसर,शिवराजनगर,रहाटणी व इतर परिसरात जलनिःसारण विषयक सुधारणा कामे करणेकामी मे.पी.व्ही.देशमुख नि.र.रू.62,86,987/- (अक्षरी र.रु.बासष्ट लाख शहाऐंशी हजार नऊशे सत्याऐंशी फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल

टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.62,64,378/-वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदरकाम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.62,64,378/-पेक्षा 27.32% कमी म्हणजेच र.रु.45,52,950/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.22,609/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.0/- = एकुण र.रु.45,75,559/-पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – ६९८६ विषय क्रमांक –३

दिनांक – ०४/०५/२०२० विभाग–वाय.सी.एम.एच.

सुचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.भामाबाई फुगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वायसीएमएच/कावि/५/४६१/२०२०, दि.१७/०३/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पदव्युत्तर संस्था व वायसीएम रूग्णालयास सर्वसाधारण शल्यचिकीत्सा या पदावरील डॉक्टरांची आवश्यकता असल्याने डॉ.अमित वाघ, यांचा या क्षेत्रातील अनुभव विचारात घेऊन त्यांची सहाय्यक प्राध्यापक सर्वसाधारण शल्यचिकीत्सा या पदावर नियुक्ती करणे आवश्यक आहे. सदर शासन निर्णयामध्ये सहाय्यक प्राध्यापक सर्वसाधारण शल्यचिकीत्सा या पदनामाचे ७ पदांना मान्यता दिलेली आहे. त्यामुळे मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्रमांक-वायसीएमएच/८/ कावि/ १३३१/२०१७, दिनांक२४/१०/२०१७ अन्वये डॉ.महेंद्र वांटे यांची सहाय्यक प्राध्यापक जनरल सर्जरी या पदावर एससी या प्रर्वगातुन आदेशाच्या दिनांकापासुन दिनांक२३/१०/२०२० या कालावधी करीता एकत्रित मानधनावर नेमणुक केलेली आहे. तसेच आदेश क्रमांक-वायसीएमएच/८ड/कावि/३५५/२०१८, दिनांक-२२-११-२०१८ अन्वये डॉ. कांचन पंकज वायकोळे, सर्जन वायसीएम रूग्णालय यांना खुल्या प्रवर्गातुन सहाय्यक प्राध्यापक, शल्यचिकित्सा ह्या पदाचा अतिरीक्त पदभार दिलेला आहे. तसेच मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्रमांक-वायसीएमएच/८ड/कावि/३६०/२०१८, दिनांक २८/११/२०१८ अन्वये डॉ. तुषार विष्णुराव जाधव व डॉ.शिरीषकुमार प्रल्हाद पन्हाळे यांची खुल्या प्रवर्गातुन ३ वर्ष कालावधीसाठी एकत्रित मानधनावर नियुक्ती करणेत आलेली आहे. सहाय्यक प्राध्यापक सर्वसाधारण शल्यचिकित्सा या पदावर खुल्या प्रवर्गातुन एकुण ३ उमेदवारांना नेमणुक दिलेली आहे. त्यामुळे सद्या डॉ. अमित वाघ यांची खुल्या प्रवर्गात सहाय्यक प्राध्यापक सर्वसाधारण शल्यचिकित्सा या पदावर नेमणुक करता येणार नाही. डॉ.अमित वाघ हे खुल्या प्रवर्गातील उमेदवार आहेत. परंतु सहाय्यक प्राध्यापक सर्वसाधारण शल्यचिकित्सा या पदनामाचे खुल्या प्रवर्गातील पद रिक्त नसल्याने डॉ.अमित वाघ यांना विजा-अ या रिक्त असलेल्या जागेवर तात्पुरत्या स्वरूपात एकत्रित मानधनावर दि.०५/०३/२०२० रोजीची एक

दिवस सेवा खंडीत करून दि.०६/०३/२०२० ते दि. ०१/०९/२०२० असे एकुण १८० दिवस आदेश क्रमांक वायसीएमएच/५/ कावि/४६०/२०२०, दि.१७/०३/२०२० दिवसांची मुदतवाढ दिलेली आहे. सबब, डॉ.अमित वाघ यांची सहाय्यक प्राध्यापक (सर्वसाधारण शल्यचिकीत्सा) या पदावर १५६००-३९१०० ग्रेड पे-६००० नुसार येणारे र.रु.७७,१३७/- (अक्षरी र.रू. सत्त्याहत्तर हजार एकशे सदोतीस फक्त) या एकत्रित मानधनावर ६ महिन्याकरीता केलेल्या नियुक्तीस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ६९८७ विषय क्रमांक –४

दिनांक – ०४/०५/२०२० विभाग–पाणीपुरवठा

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र.पापु/६/कावि/१९३/२०२०, दि.१३/०३/२०२०

मा.कार्यकारी अभियंतायांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र अ (१ते६) मधील निविदा कामांचे अवलोकन होवुन नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे तसेच भाववाढ कलमानुसार भाव वाढ देय असल्यास मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/ वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहून ठेकेदारा बरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकनकरणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – ६९८८ विषय क्रमांक –५

दिनांक – ०४/०५/२०२० विभाग–माहिती व तंत्रज्ञान

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांचे पत्र क्र.मातंवि/११/कावि/५६/२०२०, दि.२३/०३/२०२०

मा.मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

शहरात वास्तव्य करणा-या नागरिकांना कोरोना व्हायरस पासुन बचाव करणेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेबाबतच्या सुचना देणेकामी तातडीने बल्क एस एम एसचा वापर करणेत येत आहे. सदर आपत्कालीन परीस्थितीचा विचार करता तातडीची बाब म्हणुन निविदा सुचना क्र.१३/२०१४-१५ अन्वये प्राप्त दर तसेच ई-ग/९/कावि/२३९/२०१५ दि.२७/०५/२०१५ आदेशान्वये मंजुर दरांनुसार २५ लाख एसएम एस तातडीने थेट पद्धतीने करारनामा न करता खरेदी करणे व त्याकामी येणा-या र.रु.४,०७,२५०/- (अक्षरी र.रू.चार लाख सात हजार दोनशे पन्नास फक्त) सर्व करांसहीत चे कामकाजाचे आदेश क्र.मातवि/११/कावि/४०/२०२० दि.१८/०३/२०२० अन्वये निर्गत करण्यात करण्यात आलेले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – ६९८९ विषय क्रमांक –६
दिनांक – ०४/०५/२०२० विभाग–वाय.सी.एम.एच.
सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.भामाबाई फुगे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.YCMH/भांडार/६/कावि/९६/२०२०, दि.१६/०३/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –
यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या ऑपरेशन थिएटर विभागातील Pentex Gastro scope, Colono scope दुरुस्तीकामी आवश्यक पार्टस खरेदी करणेसाठी संबंधित कंपनीने M/S Pentex Medical, New Delhi यांनी एकूण र.रु.४५,९१०/-चे दरपत्रक सादर केले असुन सदरचे दरपत्रक स्विकृत करण्यात आले आहे. त्यानुसार यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या ऑपरेशन थिएटर विभागातील Pentex Gastro scope, Colono scope च्या दुरुस्तीकामी आवश्यक पार्टस खरेदीसाठी संबंधित कंपनी M/S Pentex Medical, New Delhi यांचेकडून निविदा न मागवता, करारनामा न करता मनपा अधिनियम अनुसुची प्रकरण५ (२) (२) नुसार थेट पध्दतीने खरेदी करण्यास व सदर खरेदीस होणारा खर्च एकूण र.रु.४५,९१०/-(अक्षरीर.रू. पंच्चेचाळीस हजार नऊशे दहा फक्त) ला मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – ६९९० विषय क्रमांक –७
दिनांक – ०४/०५/२०२० विभाग–वाय.सी.एम.एच.
सुचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.आरती चोंधे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.YCMH/भांडार/६/कावि/९७/२०२०, दि.१६/०३/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –
यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या डायलिसिस विभागातील R.O. Plant with Prefiltration Plant चे AMC करणेकामी संबंधित उत्पादित कंपनीचे वितरक मे.क्रिदय हेल्थ केअर, पुणे यांनी सादर केलेले एकूण र.रु.६०,०२४/- चे दरपत्रक स्विकृत करणेत आले आहे. त्यानुसार डायलिसीस विभागातील R.O.Plant with Prefiltration Plant चे AMC संबंधित उत्पादित कंपनीचे वितरक मे.क्रिदय हेल्थकेअर, पुणे यांचेकडून त्यांनी सादर केलेले दरपत्रक एकूण र.रु.६०,०२४/-(सर्व करांसहित) नुसार निविदा न मागवता, करारनामा करुन मनपा अधिनियम अनुसुची ड प्रकरण ५ (२) (२) नुसार थेट पध्दतीने करण्यास व सदर AMC साठी होणारा खर्च एकूण र.रु.६०,०२४/-(अक्षरी र.रू.साठ हजार चोवीस फक्त) (सर्व करांसहित) ला मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – ६९९१ विषय क्रमांक –८
दिनांक – ०४/०५/२०२० विभाग–जशुके से.२३, विद्युत
सुचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.राहुल कलाटे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.जशुके/वि/१/१/२०२०, दि.१६/०४/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून–

कोरोना कोवीड १९ या व्हायरसचा प्रादुर्भा व नियंत्रणाच्या कारणास्तव निविदा विषयक कामास होणारा कालापव्यय याचा विचार करता मनपाच्या थेरगाव गावठाण, थेरगाव स.नं.९, थेरगाव लक्ष्मणनगर, काळा खडक वाकड, काळा खडक बुस्टर पंप व पुनावळे येथील पंपहाऊसचे चालन करणे (२०१८-१९) या कामास दि.१/५/२०२० पासून दि.३१/१०/२०२० पर्यंत सहा महिन्यांकरिता मुदतवाढ मिळणे व त्या कालावधीतील अदा करावयांचा पंप चालनाचा खर्च र.रू.३३,०९,९८४/- (अक्षरी र.रू. तेहतीस लाख नऊ हजार नऊशे चौ-याऐंशी फक्त) व किमान कायद्यानुसार (भविष्यातील सुधारीत दरानुसार) मुदतवाढीच्या कालावधीतील वेतन फरकाची रक्कम कंत्राटी पध्दतीने पंपचालनाचे काम करणारे ठेकेदार मे.शुभम उद्योग यांचेशी सुधारित करारनामा करून अदा करणेस मान्यता देणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी असली तरी, प्रस्तुत विषयातील कामास दि.०१/०५/२०२० ते ३१/१०/२०२० पर्यंत ६ महिने करिता मुदतवाढ किंवा या कामासाठी काढलेली निविदा अंतिम होईल यापैकी जे प्रथम घडेल त्या कालावधी पर्यंत मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – ६९९२ विषय क्रमांक –९
दिनांक – ०४/०५/२०२० विभाग–जशुके से.२३, विद्युत
सुचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.राहुल कलाटे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.जशुके/वि/१/२/२०२०, दि.१६/०४/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून–

कोरोना कोवीड १९ या व्हायरसचा प्रादुर्भाव नियंत्रणाच्या कारणास्तव निविदा विषयक कामास होणारा कालापव्य याचा विचार करता मनपाच्या सांगवी गावठाण, सांगवी पी.डब्लु.डी, सांगवी स.नं.८४, पिंपळेगुरव व दापोडी येथील शुध्द पाणीपुरवठा करणा-या पंपहाऊसचे चालन करणे (२०१८-१९) या कामास दि.१/५/२०२० पासून दि.३१/१०/२०२० पर्यंत सहा महिन्यांकरिता मुदतवाढ मिळणे व त्या कालावधीतील अदा करावयांचा पंप चालनाचा खर्च र.रू.३२,८७,५२०/- (अक्षरी र.रू. बत्तीस लाख सत्याऐंशी हजार पाचशे वीस फक्त) व किमान कायद्यानुसार (भविष्यातील सुधारीत दरानुसार) मुदतवाढीच्या कालावधीतील वेतन फरकाची रक्कम कंत्राटी पध्दतीने पंपचालनाचे काम करणारे ठेकेदार मे.शुभम उद्योग यांचेशी सुधारित करारनामा करून अदा करणेस मान्यता देणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी असली तरी, प्रस्तुत विषयातील कामास दि.०१/०५/२०२० ते ३१/१०/२०२० पर्यंत ६ महिने करिता मुदतवाढ किंवा या कामासाठी

काढलेली निविदा अंतिम होईल यापैकी जे प्रथम घडेल त्या कालावधीपर्यंत मान्यता देणेत येत आहे.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – ६९९३ विषय क्रमांक –१०

दिनांक – ०४/०५/२०२० विभाग–जशुके से.२३, विद्युत

सुचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.राहुल कलाटे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.जशुके/वि/१/३/२०२०, दि.१६/०४/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून–

कोरोना कोवीड १९ या व्हायरसचा प्रादुर्भाव नियंत्रणाच्या कारणास्तव निविदा विषयक कामास होणारा कालापव्य याचा विचार करता मनपाच्या कृष्णानगर, स.नं.२२, पाटीलनगर, जाधववाडी, से १० व गवळीमाथा येथील पंप हाऊसचे चालन करणे (२०१८-१९) या कामास दि.१/५/२०२० पासून दि.३१/१०/२०२० पर्यंत सहा महिन्यांकरिता मुदतवाढ मिळणे व त्या कालावधीतील अदा करावयांचा पंपचालनाचा खर्च र.रू.३१,९६,२९६/- (अक्षरी र.रू. एकतीस लाख शहाण्णव हजार दोनशे शहाण्णव फक्त) व किमान कायद्यानुसार (भविष्यातील सुधारीत दरानुसार) मुदतवाढीच्या कालावधीतील वेतन फरकाची रक्कम कंत्राटी पध्दतीने पंपचालनाचे काम करणारे ठेकेदार मे.शुभम उद्योग यांचेशी सुधारित करारनामा करून अदा करणेस मान्यता देणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी असली तरी, प्रस्तुत विषयातील कामास दि.०१/०५/२०२० ते ३१/१०/२०२० पर्यंत ६ महिने करिता मुदतवाढ किंवा या कामासाठी काढलेली निविदा अंतिम होईल यापैकी जे प्रथम घडेल त्या कालावधी पर्यंत मान्यता देणेत येत आहे.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेतयावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – ६९९४ विषय क्रमांक –११

दिनांक – ०४/०५/२०२० विभाग–जशुके से.२३, विद्युत

सुचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.राहुल कलाटे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.जशुके/वि/१/४/२०२०, दि.१६/०४/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून–

कोरोना कोवीड १९ या व्हायरसचा प्रादुर्भाव नियंत्रणाच्या कारणास्तव निविदा विषयक कामास होणारा कालापव्य याचा विचार करता मनपाच्या रहाटणी, स.नं.९६, लांडेवाडी, दिघी, च-होली व बोपखेल येथील पंप हाऊसचे चालन करणे (२०१८-१९) या कामास दि.१/५/२०२० पासून दि.३१/१०/२०२० पर्यंत सहा महिन्यांकरिता मुदतवाढ मिळणे व त्या कालावधीतील अदा करावयांचा पंप चालनाचा खर्च र.रू.२६,१८,८२०/- (अक्षरी र.रू. सव्वीस लाख अठरा हजार आठशे वीस फक्त) व किमान कायद्यानुसार (भविष्यातील सुधारीत दरानुसार) मुदतवाढीच्या कालावधीतील वेतन फरकाची रक्कम कंत्राटी पध्दतीने पंपचालनाचे काम करणारे ठेकेदार मे.शुभम उद्योग यांचेशी सुधारित करारनामा करून अदा करणेस मान्यता देणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी असली तरी, प्रस्तुत विषयातील कामास दि.०१/०५/२०२०ते३१/१०/२०२० पर्यंत ६

महिने करिता मुदतवाढ किंवा या कामासाठी काढलेली निविदा अंतिम होईल यापैकी जे प्रथम घडेल त्या कालावधीपर्यंत मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – ६९९५ विषय क्रमांक –१२

दिनांक – ०४/०५/२०२० विभाग–ग क्षेत्रीय

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे पत्र क्र.गक्षेका/आ/४/कावि/२४१/२०२०, दि.२२/०४/२०२०

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिं.चिं.मनपाच्या ग क्षेत्रिय कार्यालयाकडील निविदा नोटीस क्र.2/2019-2020 अन्वये ग क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील औष्णिक धुरीकरणासाठी तीन चाकी चार रिक्षा टेम्पो (डिझेल) इंधनावर चालणारी वाहने वाहनचालक व इंधनासह भाड्याने घेणेकामी मे.संत फॅसिलिटी सर्व्हिसेस प्रा.लि. या ठेकेदाराकडुन निविदा र.रू.8,48,640/-(अक्षरी र.रू.आठ लाख आठ्ठेचाळीस हजार सहाशे चाळीस फक्त) पेक्षा -11.90% कमी या दराने स्विकारण्यात आली आहे. मंजुर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – ६९९६ विषय क्रमांक –१३

दिनांक – ०४/०५/२०२० विभाग–मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभा/१५/कावि/१९०/२०२०, दि.२६/०३/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

भारतीय साथरोग अधिनियम 1897, आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005, महानगरपालिका अधिनियम कलम 63(6) व कलम 67(3)(क) नुसार कोरोना विषाणूचा (COVID 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी आवश्यक साहित्य थेट पद्धतीने खरेदी करणेकामी येणा-या रुपये 12,16,118/- (अक्षरी रुपये बारा लाख सोळा हजार एकशे अठरा फक्त) चे खर्चास महापालिका अधिनियम अनुसुची प्रकरण 5(2) (2) नुसार कार्योत्तर मान्यता व मे.आध्या प्रॉपर्टीज नवी मुंबई 05 यांचे बरोबर कार्योत्तर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – ६९९७ विषय क्रमांक –१४

दिनांक – ०४/०५/२०२० विभाग–मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/४/कावि/१५६अ/२०२०, दि.२५/०३/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

भारतीय साथरोग नियंत्रन अधिनियम 1897 नुसार कोरोनाच्या अटकाव करणेकामी व कोरोना साथरोगाच्या आपत्तीजनक स्थितीचा सामना करण्यासाठी मनपाच्या आरोग्य व इतर विभाग व पोलीस उपआयुक्त विषेश शाखा पिंपरी चिंचवड यांना सॅनिटायझर (75 ML Bottel drmorpain ) 60 टक्के ते 70 टक्के अल्कोहोल युक्त मे.सिध्दी कॉपीयर्स ऍन्ड स्टुडंन्ट कंझुमर स्टोअर्स यांचेकडील लघुत्तम दर र.रू142 प्रति नग याप्रमाणे एकुण 5300 नगासाठी एकुण रूपये 7,52,600/- (अक्षरीर.रु.सात लाख बावन्न हजार सहाशें फक्त) मध्ये थेट पध्दतीने महापालिका अधिनियम कलम 63(6) व कलम 67(3) क नुसार पध्दतीने खरेदी करणेत आलेले असुन सदर खर्चास कार्योत्तर मान्यता व मे.सिध्दी कॉपीयर्स ऍन्ड स्टुडंन्ट कंझुमर स्टोअर्स यांचे बरोबर कार्योत्तर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – ६९९८ विषय क्रमांक –१५

दिनांक – ०४/०५/२०२० विभाग–मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/४/कावि/१६२/२०२०, दि.२६/०३/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम 1897, आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005, महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम 63(6) वकलम 67(3) क नुसार कोरोना विषाणुचा (Covid-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यासाठी आवश्यक स्टेरिजन सी हे जुंतुनाशक सोल्युशनची थेट पध्दतीने मे.फेथ इनोव्हेशन या उत्पादीत कंपनीकडुन खरेदी करणेकामी येणारे र.रू.56,25,000/- (अक्षरी र.रू.छप्पन्न लाख पंचवीस हजार फक्त) चे खर्चास महानगरपालिका अधिनियम अनुसुची प्रकरण 5(2) (2) नुसार कार्योत्तर मान्यता व मे.फेथ इनोव्हेशन यांचेबरोबर कार्यात्तर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – ६९९९ विषय क्रमांक –१६

दिनांक – ०४/०५/२०२० विभाग–मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/४/कावि/१९१/२०२०, दि.३१/०३/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम 1897, आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005, महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम 63 (6) व कलम 67(3) क नुसार कोरोना विषाणुचा (Covid-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी आवश्यक बॅक्टोडेक्स जंतुनाशक/दुर्गंधीनाशक औषध थेट पध्दतीने मे.युनिलॅब केमिकल्स अँड फॉर्मास्युटीकल्स या

उत्पादीत कंपनीकडुन खरेदी करणेकामी येणारे र.रू.1,37,00,000/- (अक्षरीर.रू.एक कोटी सदोतीस लाख फक्त) चे खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 67(3) क व अनुसुची ड प्रकरण क्रमांक. 5(2) (2) नुसार कार्योत्तर मान्यता व मे.युनिलॅब केमिकल्स अँड फॉर्मास्युटीकल्स यांचे बरोबर कार्यात्तर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – ७००० विषय क्रमांक –१७

दिनांक – ०४/०५/२०२० विभाग–मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/४/कावि/१९५/२०२०, दि.३१/०३/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

भारतीय साथरोग नियंत्रन अधिनियम 1897 नुसार कोरोनाच्या अटकाव करणेकामी व कोरोना साथरोगाच्या आपत्तीजनक स्थितीचा सामना करण्यासाठी मनपाच्या आरोग्य व इतर विभाग व पोलीस उपआयुक्त विषेश शाखा पिंपरी चिंचवड यांना सॅनिटायझर (50ml) 60 टक्के ते 70 टक्के अल्कोहोल युक्त र.रू.25/-प्रति नग याप्रमाणे एकुण 1,00,000 नग एकुण रूपये 25,00,000/- 2) सॅनिटायझर (100ml)60 टक्केते 70 टक्के अल्कोहोल युक्त र.रू. 50/- प्रति नग या प्रमाणे एकुण 1000 नग एकुण रूपये 50,000/-अशी एकुण र.रु.25,50,000/- मध्ये महापालिका अधिनियम कलम 63(6) व कलम 67(3) क नुसार थेट पध्दतीने खरेदी करणेत आलेले असुन सदर खर्चास कार्योत्तर मान्यता व मे.फार्मडील यांचेबरोबर कार्योत्तर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – ७००१ विषय क्रमांक –१८

दिनांक – ०४/०५/२०२० विभाग–मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/४/कावि/२०५/२०२०, दि.०३/०४/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

भारतीय साथरोग नियंत्रन अधिनियम 1897 नुसार कोरोनाच्या अटकाव करणेकामी व कोरोना साथरोगाच्या आपत्तीजनक स्थितीचा सामना शहरातील नागरीकांना आवश्यक मदत करण्यासाठी मनपा वैद्यकिय व आरोग्य विभागाकडुन विविध उपाययोजना राबविल्या जात आहेत.संपुर्ण शहरतील कोरोना विषाणुचा वाढता प्रादुर्भाव, प्रसार रोखण्यासाठी मनपाच्या वतीने शहरातील नागरीकांना कोरोना विषाणुच्या अटकावासाठी सन्मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.पदाधिकारी, मा.नगरसदस्य, मा.विरोधी पक्षनेता, मा.गटनेता, यांचेकडुन सॅनिटाझर उपलब्ध करून द्यावेत अशी मागणी होत आहे.त्यानुसार सॅनिटायझर (50ml) 60 टक्के ते 70 टक्के

अल्कोहोल युक्त र.रू.25/- प्रति नग याप्रमाणे एकुण 1,00,000 नग (एक लाख नगाची) एकुण रूपये 25,00,000/-(अक्षरी र.रू.पंचवीस लाख फक्त) मध्ये महापालिका अधिनियम कलम 63(6) व कलम 67(3) क नुसार थेट पध्दतीने खरेदी करणेत आलेले असुन सदरचे खर्चास कार्योत्तर मान्यता व मे.फार्मडील. यांचेबरोबर कार्योत्तर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – ७००२ विषय क्रमांक –१९

दिनांक – ०४/०५/२०२० विभाग–वायसीएमएच स्टेशनरी

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.YCMH/भांडार/०२/कावि/११३/२०२०, दि.१०/०४/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

कोरोना या विषाणुचा सर्वत्र फैलाव झालेला असल्याने त्याचा प्रार्दुभाव पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रामध्ये पसरत आहे. भारतीय साथरोग अधिनियम 1897 आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 व महानगरपालिका अधिनियम कलम 63 (6) नुसार कोरोना (COVID 19) चा साथरोगाच्या वैद्यकीय उपचारासाठी यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात तयार करणेत आलेल्या कोरोना आयसोलेशन वॉर्डसाठी Portable X-Ray Machine-04 नग व Mobile Dr Equipment & 100 MA HR X-Ray - 01 नग, नविन भोसरी रुग्णालयास Portable X-Ray Machine-01 नग व जिजामाता रुग्णालयास Mobile Dr Equipment & 100 MA HR X-Ray - 01 नग तातडीने आवश्यक असुन त्यासाठी आवश्यक उपकरणे/ साहित्य खरेदी करावयाचे आहेत.वायसीएम रुग्णालय येथे तयार करणेत आलेला कोरोना आयसोलेशन वॉर्ड, नवीन भोसरी रुग्णालय व जिजामाता रुग्णालयासाठी आवश्यक साहित्य/ उपकरणे खरेदीसाठी एकुण र.रु.97,06,000/-सर्व करांसहीत एवढया किमंतीचे अंदाजपत्रक तयार करणेत आलेले होते. याप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 63 (6) व कलम 67 (3) क नुसार तात्काळ खरेदी करणेसाठी संबंधीत उत्पादित कंपनी / त्यांचे अधिकृत विक्रेते, अथवा अधिकृत पुरवठादार यांनी त्यांचे दरपत्रक व इतर आवश्यक कागदपत्रे दि.08/04/2020 रोजी दुपारी 3.00 वाजेपर्यंत सादर करणेकामी जाहीर सुचनाक्र.1/2020-21 मनपाच्या अधिकृत वेबसाईटवर एक दिवसासाठी प्रसिध्द करणेत आलेली होती. त्यानुसार मे.फोनिक्स मायक्रो सिस्टीम, भोसरी, पुणे यांचे बाब क्र.01 व 02 साठी एकुण र.रु.95,91,000/- याप्रमाणे लघुत्तम दर प्राप्त झालेले आहेत. प्राप्त दर हे अंदाजपत्रकीय दर र.रु.97,06,000/-पेक्षा 1.18 टक्केने कमी आहेत.त्यानुसार एकुण र.रु.95,91,000/-(अक्षरी र.रू.पंच्याण्णव लाख एक्याण्णव हजार फक्त) चे खर्चास व संबंधीत पुरवठाधारकाशी कार्योत्तर करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – ७००३ विषय क्रमांक –२०
दिनांक – ०४/०५/२०२० विभाग–मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.आरती चोंधे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/०४/कावि/२५१/२०२०, दि.१५/०४/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम 1897, आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005, महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम 63(6) व कलम 67(3) क नुसार कोरोना विषाणुचा (Covid-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी आवश्यक लाईफबॉय साबण (125 ग्रॅम) थेट पध्दतीने मे.हिदुस्तान लिव्हर या उत्पादीत कंपनीचे अधिकृत होलसेल विक्रीते मे.जिंदल ट्रेडींग कंपनी प्रा.लि यांचेकडुन खरेदी करणेकामी येणारे र.रू.32,27,200/- (अक्षरी र.रू.बत्तीस लाख सत्तावीस हजार दोनशें फक्त) चे खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 67(3) क व अनुसुची ड प्रकरण क्रमांक.5(2)(2) नुसार मा.स्थायी समितीची कार्योत्तर मान्यता व मे.जिंदाल ट्रेडींग कंपनी प्रा.लि. यांचेबरोबर कार्यात्तर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – ७००४ विषय क्रमांक –२१
दिनांक – ०४/०५/२०२० विभाग–मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/१७/कावि/१७/२०२०, दि.२७/०४/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

कोरोनाच्या अटकाव साठी व कोरोनाच्या साथीचा सामना करण्यासाठी मनपाच्या वायसीएम रुग्णालयातील कोरोना वार्डकरिता अल्पमुदतीची जाहिर सूचना क्रं 01/2020-21 अन्वये Motorized ICU BED खरेदी कामी दरपत्रक मागविणेत आले होते. त्यानुसार मे.धर्मे एंटरप्रायजेस चिंचवड यांचेकडील प्राप्त लघुत्तम दर प्रती नग र.रू.1,30,000/- प्रमाणे एकुण 15 नग Motorized ICU BED जीएसटीसह एकुण र.रु.19,50,000/- (अक्षरी र.रु एकोणीस लाख पंन्नास हजार फक्त) मध्ये खरेदी करणेस चे खर्चास मान्यता व मे.धर्मे एंटरप्रायजेस चिंचवड यांचे बरोबर करारनामा करुन घणेस कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – ७००५ विषय क्रमांक –२२

दिनांक – ०४/०५/२०२० विभाग–मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.अति. आयुक्त(२) यांचे पत्र क्र.मध्यवर्ती/भांडार/१६/कावि/२८/२०२०,
दि.२८/०४/२०२०

मा.अति. आयुक्त(२) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयास आवश्यक सोनोग्राफी कलर डॉपलर उपकरण खरेदीसाठी ई.नि.सु.क्र.०८/२०१९-२० अन्वये निविदा प्रसिध्द करुन मागविणेत आल्या होत्या. त्यानुसार प्राप्त निविदेमध्ये मे.एन.एल.हेल्थकेअर, पुणे यांचे एकुण ०२ नग सोनोग्राफी कलर डॉपलर उपकरण खरेदी करणेकामी र.रु.८८,६७,०००/- असे लघुत्तम दर प्राप्त झालेले असुन सदरचे दर स्विकृत करणेत आलेले आहेत. त्यानुसार मे.एन.एल.हेल्थकेअर, पुणे यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस व सदरच्या खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/३/कावि/४९३/२०२०
दिनांक – ०६/०५/२०२०

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाही

## (क्र.पापु/६/कावि/१९३/२०२० दि.१३/०३/२०२० विषय क्र.४ चे लगत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पाणीपुरवठा विभाग पिंपरी-१८
क्र.पापु/कावि/०६/१९३/२०२०
दि. १३ ०३/२०२०

प्रपत्र अ ( १ ते ६ )

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेली तारिख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेशाची तारीख | निविदा रक्कम | रॉयल्टी व मटेरियल टेस्टींग रक्कम वगळून निविदा रक्कम | रॉयल्टी ची रक्कम | मटेरियल टेस्टिंग चार्जेस | स्विकृत दर | | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम खालीलप्रमाणे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | | १३ |
| १ | मे फ्लोमॅक इंजिनिअरिंग कार्पोरेशन | 2/100/2019-2020 | मनपाच्या थेरगाव गावठाण ,स.न.९,थेरगाव ,लक्ष्मन नगर येथील पंप हाउस चे देखभाल दुरुस्ती करणे. | १८-०२-२०२० | पापु/०६/१३१/२०२० | २०-०२-२०२० | २५,००,००० | २५,००,००० | ० | ० | १.५० | % कमी | २४,६२,५०० |
| २ | मे फ्लोमॅक इंजिनिअरिंग कार्पोरेशन | 2/92/2019-2020 | मनपाच्या रहाटणी स.नं.२० येथील शुद्ध पाणीपुरवठा करणा-या पंप हाऊसचे देखभाल दुरुस्ती करणे | १८-०२-२०२० | पापु/०६/१२७/२०२० | २०-०२-२०२० | २०,००,००० | २०,००,००० | ० | ० | १.५० | % कमी | १९,७०,००० |
| ३ | मे फ्लोमॅक इंजिनिअरिंग कार्पोरेशन | 2/94/2019-2020 | मनपाच्या सांगवी पीडब्ल्युडी, सांगवी गावठाण व सांगवी स.नं.८४ येथील शुद्ध पाणीपुरवठा करणा-या पंप हाऊसचे देखभाल दुरुस्ती करणे | १८-०२-२०२० | पापु/०६/१२९/२०२० | २०-०२-२०२० | २५,००,००० | २५,००,००० | ० | ० | १.५० | % कमी | २४,६२,५०० |
| ४ | मे फ्लोमॅक इंजिनिअरिंग कार्पोरेशन | 13/05/2019-2020 | अशुद्ध जलउपसा केंद्र रावेत येथिल म. रा. वि. वि .कंपनी उच्चदाब वीजभार वाढविणेकामी २२ के व्ही मिटरिंग क्युबिकल बदलणे व आनुषंगिक कामे करणेबाबत | २८-०२-२०२० | पापु/०६/१७३/२०२० | ०५-०३-२०२० | १०,२४,८१८ | १०,२४,८१८ | ० | ० | ४.५० | % कमी | ९,७८,७०१ |
| ५ | मे व्हॅन इंजिनिअरिंग कंपी | 8/03/2019-2020 | अशुद्ध जलउपसा केंद्र रावेत येथील पंपगृहातील टप्पा १ ते ४ डिलीव्हरी लाइनवरील व्हाल्व्ह अक्व्युएटर्सची वार्षिक पद्धतीने देखभाल दुरुस्ती करणे. | ११-०२-२०२० | पापु/०६/११९/२०२० | १२-०२-२०२० | २२,२९,६६३ | २२,२९,६६३ | ० | ० | २.४० | % कमी | २१,७६,१५१ |
| ६ | मे रुपलक्ष्मी इलेक्ट्रीकल्स | 8/07/2019-2020 | मनपाचे विविध पंपगृहात पाणीपुरवठा विभागाच्या मागणीनुसार जनित्र संच बसविणे व अनुषंगिक कामे करणे या अंतर्गत दापोडी पंप हाऊस येथे जनित्र संच बसविणे व अनुषंगिक कामे करणे | ०३-०३-२०२० | पापु/०६/१६२/२०२० | ०५-०३-२०२० | १५,०५,८३२ | १५,०५,८३२ | ० | ० | १५.१५ | % कमी | १२,७७,६९८ |
| | एकुण र.रु. | | | | | | १,१७,६०,३१३ | १,१७,६०,३१३ | ० | ० | | | १,१३,२७,५५० |

कार्यकारी अभियंता
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८